सकाळ

# सहकारी संस्थांची हवी सामाजिक बांधिलकी

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : चिक्कोडीत रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या शाखेचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

चिक्कोडी, ता. २३ : सहकार क्षेत्र विस्तारत असले तरी प्रत्येक संस्थांना सामाजिक बांधिलकी पाहिजे. त्यांना लोकही चांगले सहकार्य करतात. या सामाजिक कार्यामुळेच रवळनाथ हौसिंग सोसायटी ही केवळ नोकरदारांसाठी नव्हे, तर सामान्य लोकांच्याही मनात घर करून राहिली असल्याचे गौरवोद्‌गार माजी राजदूत व परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी काढले.

रवळनाथ हौसिंग को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. (मल्टिस्टेट) आजरा या संस्थेच्या चिक्कोडी शाखेच्या उद्‌घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी निडसोशी मठाचे पंचम शिवलिंगेश्वर स्वामी यांची उपस्थिती होती. पंचम शिवलिंगेश्वर स्वामी म्हणाले, सहकारामुळे ग्रामीण लोकांचा विकास होत आहे. सहकार क्षेत्राचे देशाच्या विकासात मोठे योगदान आहे. रवळनाथ परिवार केवळ स्वतः पुढे जात नाही, तर इतरांना घेऊन जात आहे.

सौहार्द फेडरेशनचे संचालक जगदीश कवटगीमठ म्हणाले, रवळनाथ संस्थेमुळे चिक्कोडी भागातील ग्राहकांचे घरांचे स्वप्न पूर्ण होईल. संस्थेतून कमी व्याजात कर्जाची सोय असल्याने उपयोग होईल.



चिक्कोडी : येथे रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या शाखेचे उद्‌घाटन करताना पंचम शिवलिंगेश्वर स्वामी, डॉ. ज्ञानेश्वर मुळे, एम. एल. चौगुले. मीना रिंगणे, जयपाल बोके आदी.

संस्थापक एम. एल. चौगुले म्हणाले, १४ ऑक्टोबर १९९६ रोजी आजरा महाविद्यालय व आजरा हायस्कूलमधील शिक्षकांच्या मदतीने केवळ १८ सभासद व १० हजार भागभांडवलावर संस्थेची स्थापना केली. संस्थेचे १३२८८ सभासद असून ४७० कोटींच्या ठेवी असून ३४९ कोटींचे कर्ज वाटप केले आहे. संस्थेला २०१५ मध्ये मल्टिस्टेट दर्जा मिळाला असून महाराष्ट्र, कर्नाटक व दिल्ली असे कार्यक्षेत्र आहे. चौदावी शाखा चिक्कोडीत सुरू करत आहोत.

व्यासपीठावर मुख्य शाखेच्या उपाध्यक्षा मीना रिंगणे, चिक्कोडी शाखेचे सल्लागार समितीचे अध्यक्ष जयपाल बोके, सीईओ डी. के. मायदेव होते. कार्यक्रमास सुनील काजगार, भीमाप्पा माळी, प्रशांत वरदाई, गुरूपाद मरीगुद्दी, गुरूराज यळवट्टीमठ, मल्लिकार्जून मुगेरी, महेंद्र शाहा, माजी नगराध्यक्ष प्रवीण कांबळे, एच. एस. नसलापुरे यांच्यासह मुख्य शाखेचे संचालक, पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. जयश्री नागरळ्ळी यांनी सूत्रसंचालन केले.

Belgaum, Belgaum-Today
24/12/2024 Page No. 5